**Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences** ISSN: 2581-6241
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 5.146
Volume - 5, Issue - 10, October - 2022 Publication Date: 31/10/2022

DOIs:10.2018/SS/202210004 --:-- Research Article

# नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांचा त्यांच्या शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास.

**"A Study of Career Awareness of Higher Secondary School Students in Rural Area of Nashik District in Relation to Their Educational Environment."**

**[1]डॉ. चव्हाण चेतन उत्तमराव, [2]श्री. पिठे अर्जुन धोंडीराम.**
[1]सहयोगी प्राध्यापक, गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, मुंबई.
ई-मेल: dr.cuchavan@gmail.com,
[2] संशोधक, गोखले एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर,
जिल्हा - अहमदनगर, ई-मेल: adpithe22@rediffmail.com,

**सारांश** (***Abstract***): उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी "मध्यम (Moderate)" स्वरूपाची असते. त्यामध्ये वाढ करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात भरपूर चांगल्या (Substantial)स्वरूपाचा संबंध असतो. त्यामुळे व्यावसायिक जाणीव निर्माण करण्यासाठी अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे शैक्षणिक वातावरणात कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांनुसार फरक असतो म्हणून त्यांना वेगवेगळ्या स्वरूपाचे त्यांच्या विषयातील आशयावर आधारित व्यवसाय मार्गदर्शन देण्यासाठी प्राधान्य द्यावे त्याचप्रमाणे त्यांच्या शैक्षणिक वातावरणात मुली आणि मुले यानुसार फरक नसतो त्यामुळे व्यावसायिक जाणीव निर्माण करताना मुले व मुली असा भेदभाव करू नये. अनुदानित व विना-अनुदानित उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात फरक असतो. विना-अनुदानित शाळेतील उच्च शैक्षणिक वातावरण्याची पातळी असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असते म्हणून या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच व्यवसाय, नोकरी, शेती या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार शैक्षणिक वातावरणात कोणताही फरक नसतो त्यामुळे सर्वांना सामान स्वरूपाची व्यावसायिक जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न व्हावे. या विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा प्रभाव असतो त्यामुळे व्यावसायिक जाणिवेस अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण केल्यास व्यावसायिक जाणिवेत वाढ होऊ शकते.

**सूचक शब्द *(Key Words):*** उच्च माध्यमिक शाळा, व्यावसायिक जाणीव, शैक्षणिक वातावरण, ग्रामीण भाग.

## 1. प्रस्तावना (INTRODUCTION):

विदयार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट मानले जाते. शिक्षणातील शैक्षणिक संपादणूक ही भविष्यकालिन जीवनातील व्यवसाय निवडीची गुरुकिल्ली आहे. उच्च माध्यमिक स्तर हा विदयार्थ्यांसाठी व्यवसाय निवडीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यावर जर विदयार्थ्यांने अचूक व्यवसायाची त्याच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार निवड केल्यास तसेच त्यासाठी त्याला योग्य मार्गदर्शन मिळाल्यास तो भविष्यकालिन जीवनात यशस्वी होऊ शकतो. यासाठी विदयार्थ्याला या स्तरावर व्यसायिक जाणीव असणे अत्यंत महत्त्वाचे असते. व्यावसायिक प्रगती ही देशाच्या विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असते. आज शासन स्तरावर शिक्षणाचे व्यावसायिकीकरण करण्यासाठी विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. परंतु अजूनही आपल्या देशात ग्रामीण भागात शिक्षणाची स्थिती व विदयार्थ्यांना असलेल्या व्यवसायाची जाणीव म्हणावी तितकी चांगली नाही. याला अनेक घटक कारणीभूत आहेत. प्रवेश घेतलेल्या प्रत्येक विदयार्थ्याने जीवनामध्ये योग्य यश संपादन करावे. योग्य व्यवसायाची निवड करुन जीवनात यशस्वी व्हावे अशी शासनापासून पालकांचीही अपेक्षा असते परंतु योग्य व्यावसायिक शिक्षणात प्रवेश मिळणे व त्यात यशस्वी होणे हे शैक्षणिक संपादनावर अवलंबून असते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर त्याची अनुवंशिकता व त्याला मिळत असलेले सामाजिक व शैक्षणिक वातावरण याचा मोठा प्रभाव पडत असतो. विद्यार्थी ज्या सामाजिक व आर्थिक स्तरातून येतो त्याचा परिणाम त्याच्या व्यक्तीमत्त्वाप्रमाणेच त्याच्या शैक्षणिक प्रगतीवर व व्यवसाय निवडीवरही पडत असतो.

विद्यार्थ्यांना माध्यमिक स्तरापासूनच व्यावसायिक जाणीव होते. सामाजिक आंतरक्रियांमधून व सामाजिक शिक्षणातून यात बदल होत जातो. शाळा विद्यार्थ्यांचा औपचारिक व अनौपचारिक अशा दोन्ही प्रकारचा विकास करीत असते. शैक्षणिक संपादनाबरोबरच बालकाचा व्यावसायिक जाणीवांचा विकास हा उच्च माध्यमिक शाळेत चांगल्या प्रकारे होत असतो. त्याचाच परिणाम पुढे त्यांच्या व्यवसाय निवडीवर होत असतो. विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर प्रभाव करणारे अनेक घटक असतात. त्यातील शालेय वातावरणाचा होणारा प्रभाव उच्च माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. व्यावसायिक जाणीवेमध्ये व्यवसायातले वातावरण कसे असावे याची माहिती असणे गरजेचे आहे. आपल्या व्यवसायामध्ये असे लोकशाहीचे वातावरण असले पाहिजे की, कर्मचारी तुम्हाला येऊन नव्या कल्पना सूचवू शकतील. संशोधकाने पूर्वी झालेल्या संशोधनाचे सिंहावलोकन केले तेव्हा त्यात विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक जाणीवेचा विकास करणे व त्यानुसार संपादन पातळीचे उद्दिष्ट प्राप्त करणे या दृष्टीने अजूनही ब-याच त्रुटी असल्याचे आढळून आले. संशोधक हा स्वतः शिक्षणशास्त्र महाविदयालयात सहाय्यक प्राध्यापक

असल्याने उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांशी सराव पाठांच्या निमित्ताने संबंध येतो. तसेच बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांशीही संबंध येत असल्याने दैनंदिन अध्यापनात शालेय वातावरण घटक महत्त्वाचा असल्याचे आढळून आले.

यासंबंधी आतापर्यंत संशोधन झालेले आढळून आले असले तरीही ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीवांच्या त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास याबाबत फारसे संशोधन झाल्याचे आढळून आले नाही आपल्या देशातील प्रत्येक विद्यार्थी हा आपल्या देशाची संपत्ती आहे या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीवेचा विकास झाल्यास तो योग्य व्यवसाय निवडु शकेल व त्यातून स्वतःच्या विकासाबरोबरच राष्ट्राचाही विकास होईल या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. प्रत्येक व्यक्तीच्या स्वतःच्या व्यवसाय निवडीबाबतच्या कल्पना हया भिन्न-भिन्न असू शकतात. यावर सामाजिक आणि शालेय वातावरणाचा व्यावसायिक जाणीवेशी काही संबंध आढळून येतो का हा प्रश्न संशोधकाला पडला असल्याने ग्रामीण उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीवांच्या त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणे आजच्या काळाची गरज आहे असे संशोधकाला वाटते.

**2. संबंधित साहित्याचा आढावा (LITERATURE REVIEW):**

अ. वर्तमानपत्रातील बातम्या

कंठे, तनुजा (१९ ऑगस्ट २०२०): दैनिक सामनामध्ये नव्या शैक्षणिक धोरणात व्यावसायिक शिक्षण या शीर्षकाखाली लेख लिहला होता. या लेखामध्ये नवीन शैक्षणिक धोरणात अनेक सुधारणांचे सुतोवाच करण्यात आले आहे. त्यात व्यवसाय अभ्यासक्रमातील सुधारणांचाही समावेश आहे.

वार्ताहर (१९ मार्च २०२१): महाराष्ट्र टाईम्स या दैनिकात शाळा, कॉलेजात व्यावसायिक शिक्षण अभयासासाठी समिती या शीर्षकांतर्गत बातमी प्रसिध्द झाली होती. या बातमीत केंद्र सरकारने जाहीर केलेल्या नवीन शैक्षणिक धोरण- २०२० मध्ये व्यावसायिक शिक्षणाला नवीन स्वरुप देण्याचे नमुद केले आहे

ब. पुस्तके

दुनाखे, अरविंद (२००६) यांनी लिहलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन या पुस्तकात प्रकरण दहा व अकरा मधील माहितीचा संशोधकास उपयोग झाला.

सरवदे, शशी (२००८) यांनी लिहलेल्या मार्गदर्शन व समुपदेशन या पुस्तकात व्यवसाय विकासासंबंधी दोन प्रकरणांचा समावेश केला.

क. संशोधनाशी संबंधित मासिके

नलावडे, प्रमोद (जून २०१३) यांनी लोकराज्य या मासिकाच्या संपादकीय लेखामध्ये व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे.

पोतदार, योगिनी (मे-जून २०१९) यांनी शिक्षण संक्रमण या मासिकात कौशल्याचा विकास साधणारे शिक्षण या लेखात कौशल्याधारित व्यावसायिक शिक्षणावर आपली मते व्यक्त केली आहेत. व्

**2.1 संबंधित संशोधनाचा आढावा:**

कोणत्याही संशोधनाचा आधार स्त्रोत म्हणजे त्याच्या निकटचे व त्याच विषयावरील झालेल्या संशोधनाचे संकलन होय. प्रस्तुत विषयासंदर्भात शिक्षणावरील संशोधनाचे संकलन पुढीलप्रमाणे..

भारतीय संशोधने

शालेय वातावरण:

पीएच. डी. स्तरावरील संशोधने

गुप्त, विश्वनाथ (२००६) यांनी डॉ. राममनोहर लोहिया अवध विदयापीठ, फैजापूर येथे शिक्षणशास्त्र विषयात केंद्राशी संबंधित व्यावसायिक शिक्षण अभिवृत्ती आणि प्रभाव एक अभ्यास या विषयावर प्रबंध सादर केला. या संशोधनाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती. केंद्राच्या व्यावसायिक शिक्षणयोजनांच्या बद्दल विदयार्थ्यांच्या अभिवृत्तीचा अभ्यास करणे, केंद्राच्या व्यावसायिक शिक्षणयोजनांच्या बद्दल ग्रामीण व शहरी विदयार्थ्यांच्या अभिवृत्तीचा तुलनात्मक अभ्यास करणे, विभिन्न वयाच्या विदयार्थ्यांच्या केंद्राच्या व्यावसायिक शिक्षण योजनांच्या अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास करणे, केंद्र सरकारच्या व्यावसायिक शिक्षणाबद्दलच्या विविध ट्रेडच्या विदयार्थ्यांच्या अभिवृत्तीची तुलना करणे. या संशोधनासाठी अभिवृत्ती मापिका, मुलाखत आणि निरीक्षण या साधनांचा वापर केला आहे. या संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे होते.

केंद्र सरकारच्या व्यावसायिक शिक्षणाच्या योजनांबद्दल विदयार्थी-विदयार्थिनींच्या अभिवृत्तीत सार्थ फरक आढळतो. विदयार्थिनी व्यावसायिक शिक्षणाबद्दल अधिक जागरुक आहेत. केंद्र सरकारच्या व्यावसायिक शिक्षणाच्या योजनांबद्दल हिंदू आणि मुस्लिम विदयार्थ्यांच्या अभिवृत्तीमध्ये सार्थ फरक आढळतो. हिंदू धर्मातील विदयार्थ्यांमध्ये व्यावसायिक शिक्षणाबद्दल उच्च स्तरावरील अभिवृत्ती आढळून येते. व्यावसायिक शिक्षणाबद्दल सामान्य आणि मागास जातीतील विदयार्थ्यांच्या अभिवृत्तीबद्दल सार्थ फरक आढळतो. मागास जातीतील विदयार्थ्यांची व्यावसायिक शिक्षणाबद्दलची अभिरुची उच्च धनात्मक आहे. व्यावसायिक शिक्षणाबद्दल कमी उत्पन्न गटाच्या आणि मध्यम उत्पन्न गटाच्या अभिवृत्तीत सार्थ फरक आढळतो. मध्यम उत्पन्न गटातील विदयार्थ्यांची व्यावसायिक शिक्षणाबद्दलची अभिवृत्ती उच्च सकारात्मक आहे.

भोईर, हरिशचंद्र(२०१८): यांनी ठाणे जिल्हयातील आदिवासी भागातील माध्यमिक विदयार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर व स्वजाणीवेवर सामाजिक आणि शालेय वातावरणाचा प्रभाव आणि त्यांच्यातील सहसंबंधांचा अभ्यास केला. त्यात त्यांनी आदिवासी भागातील माध्यमिक शाळांतील १०००

विदयार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड केली. सदर संशोधनात विदयार्थ्यांच्या सामाजिक-आर्थिक दर्जाचा अभ्यास करण्यासाठी शोधिकेचा व प्रश्नावलीचा वापर केला आहे. स्वजाणीवेचा अभ्यास करण्यासाठी पदनिश्चयन श्रेणीचा वापर केला आहे. पालक, शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी मुलाखती व प्रश्नावलीचा वापर केला आहे. सदर संशोधनात त्यांनी शैक्षणिक संपादन, स्वजाणिव, सामाजिक आणि शालेय वातावरण इत्यादी बाबीिंवषयी माहिती संकलित करुन निष्कर्ष मांडले आहेत.

क. व्यावसायिक जाणीव

पीएच. डी. स्तरावरील संशोधने

भटनागर, एच. (१९८३) यांनी पीएच. डी. पदवीसाठी हिमाचल प्रदेश विदयापीठ येथे किशोरावस्थेतील विदयार्थ्यांची व्यावसायिक निवड आणि त्यांच्या अभिरूचीला प्रभावित करणा-या घटकांचा अभ्यास करणे. या संशोधनाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होते. किशोरावस्थेतील विदयार्थिनींच्या व्यवसाय निवडीवर व्यावसायिक अभिरूचीच्या प्रभावाचा अभ्यास करणे, उच्च आणि निम्न आर्थिक परिस्थिती असणा-या विदयार्थिनींच्या व्यावसायिक निवडीचा अभ्यास करणे, शहरी आणि छोटया वस्त्यांमध्ये राहणा-या विदयार्थिनींची व्यावसायिक अभिरूची जाणून घेणे. या संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे होते. किशोरावस्थेतील विदयार्थिनींची व्यवसाय निवड आणि व्यावसायिक अभिरूची सर्वाधिक प्रभावित करते. उच्च आर्थिक स्तर आणि निम्न आर्थिक स्तर असणा-या विदयार्थिनींच्या व्यावसायिक अभिरूचीमध्ये सर्वाधिक अंतर दिसून येते. शहरी आणि छोटया वस्त्यांमध्ये राहणा-या विदयार्थिनींच्या व्यावसायिक अभिरूचीमध्ये अंतर दिसून आले नाही.

मोहंती, जी. (१९८६) यांनी राजस्थान विदयापीठात शिक्षणशास्त्र विषयात पीएच. डी. पदवीसाठी 'स्वातंत्र्यानंतर ओरिसा राज्यातील व्यावसायिक शिक्षण एक सर्वेक्षण' या विषयावर प्रबंध सादर केला. या संशोधनाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होते. १९४७ ते १९८१ या कालावधीत ओरिसा राज्यातील व्यावसायिक शिक्षणाच्या परिस्थितीची माहिती घेणे, व्यावसायिक शिक्षणाच्या योजना आणि कार्यक्रमांमध्ये आयोजित केल्या जाणा-या प्रशिक्षण उपक्रमांची माहिती घेणे, यासारख्या प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रभावाच्या संदर्भात व्यावसायिक संस्थांचे विचार जाणून घेणे, व्यावसायिक शिक्षणाच्या क्षेत्रातील सुधारणांच्या पध्दतींची माहिती घेणे. या संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे होते. १९४७ ते १९७१ पर्यंत १०६ आणि १९८१ पर्यंत १२४ विदयालयांनी तांत्रिक शिक्षण विदयार्थ्यांना दिले आहे. स्त्रियांच्या तुलनेत पुरुष व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे जास्त आकर्षित होतात. स्त्रिया संगीत, नृत्य, नाटक, शिलाई, टंकलेखन यासारख्या क्षेत्रात आपली आवड दाखवित आहेत. प्रशिक्षण संस्था आणि कृषी कार्यात असमानता दिसून

पाश्चिमात्य संशोधने:

चार्लस, अनगरलीडर (२००८) यांनी केनेडियन 'कौन्सिल ऑफ लर्निंग येथे इव्हाल्युएशन ऑफ द ऑन्टिरिओ मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन स्टुडंटस सक्सेस लर्निंग स्ट्रॅटेजी.' या विषयाचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी ३०० विदयार्थ्यांची मुलाखत घेतली. तसेच त्यांनी घेतलेल्या मुलाखतीत मंत्रालयातील कर्मचारी, ऑन्टिरिओ येथील विश्वस्त, शिक्षक, विदयार्थी, पालक यांचा समावेश केला. त्यांना असे आढळले की, शालेय संस्कृती वाढविण्यासाठी उत्तेजन देण्याची गरज आहे. तसेच शिक्षण प्रक्रियेत सुधारणा घडवून आणण्यासाठी पालकांशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. तसेच विदयार्थी जेव्हा प्राथमिक शाळांमधून माध्यमिक शाळांत जातात तेव्हा त्यांच्यावर वैयक्तिकरित्या देखरेख करण्याची गरज आहे, असा निष्कर्ष त्यांनी मांडला आहे. त्याचबरोबर सरकारने विदयार्थ्यांना केंद्रस्थानी ठेऊन विविध संरचनात्मक काम करावे, सोयी सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी शिफारस केली आहे.

ब्रेंडा जीमारा मेंजीओ (२०११) यांनी पर्सिव्हड करिअर बॅरियर्स 'द रोल ऑफ इथनिक आयडेंटीटी अक्कुलटरेशन अँड सेल्फ इफ्फीक्याशी मेडीटर्स अमाँग लॅटीना कॉलेज स्टुडंटस या विषयात अभ्यास केला.' त्यांनी ३५७ लॅटीना अंडरग्रॅज्युएट्स स्टुडंटसची नमुना म्हणून निवड केली. ३५७ सहभागी विदयार्थ्यांपैकी २४७ मुली (६९.२ टक्के) आणि ११० (३०.८ टक्के) होते. संशोधकाने स्वतः तयार केलेल्या साधनाचा वापर करण्यात आला. ऑनलाईन सर्वेक्षण केले.. सहसंबंध गुणक आणि मल्टिव्हरीएंट अनालिसिस ऑफ वॅरियन्सचा उपयोग करुन माहितीचे विश्लेषण करण्यात आले व निष्कर्ष काढण्यात आले.

### 2.2 संशोधनाचे वेगळेपण:

संशोधनाचे वेगळेपण, प्रस्तुत संशोधनासाठी केवळ ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळांचीच निवड करण्यात आली आहे. माहिती संकलनासाठी प्रस्तुत संशोधनात प्रश्नावलीचा वापर करण्यात आला आहे. विदयार्थ्यांची व्यावसायिक जाणिवांचा त्यांच्या शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करण्यासाठी दृष्टिकोन मापिकेचा वापर केला आहे.

### 3. प्रस्तुत संशोधनाची पध्दती (METHODS & MATERIALS):

प्रस्तुत संशोधन पध्दतीत वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

संशोधन समस्येचे शीर्षकः

"नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांचा त्यांच्या शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास. "

### 3.1 कार्यात्मक व्याख्याः

नाशिक जिल्हा - महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हयांपैकी एक जिल्हा ज्या जिल्हाच्या पूर्वेला जळगाव जिल्हा, पश्चिमेला गुजरात राज्यातील वलसाड जिल्हा, दक्षिणेला अहमदनगर जिल्हा आणि उत्तरेला धुळे जिल्हा आहे, असा जिल्हा म्हणजे नाशिक जिल्हा होय.

उच्च माध्यमिक शाळा-ना शिक जिल्हाच्या ग्रामीण भागातील महाराष्ट्र राज्य एच. एस. सी. बोर्डाचा अभ्यास क्रम राबविण्या-या ज्या शाळांमध्ये इयत्ता ११ वी आणि इयत्ता १२ वी चे शिक्षण दिले जाते. अशा शाळा म्हणजे उच्च माध्यमिक शाळा होय.

शैक्षणिक वातावरण- नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील संशोधकाने निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या शाळेतील भौतिक व शैक्षणिक सुविधांची पार्श्वभूमी किंवा परिस्थिती म्हणजे शालेय वातावरण होय.

ग्रामीण भाग- नाशिक जिल्हयातील शहरी भागाव्यतिरिक्त असलेला भाग तसेच नाशिक जिल्हयातील तालुक्याचे ठिकाण वगळून असलेला भाग किंवा नाशिक जिल्ह्यातील ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भाग म्हणजे ग्रामीण भाग होय.

व्यावसायिक जाणीव- व्यावसायिक जाणीव म्हणजे नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील संशोधकाने निवडलेल्या उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टिकोन, विद्यार्थ्यांचे व्यवसायाविषयीचे मत, व्यवसायाविषयीचे ज्ञान, व्यवसायाची उपयोगिता, व्यवसायाचा जीवनाशी संबंध, व्यवसायाचे महत्त्व, व्यवसायासाठी लागणारे आवश्यक कौशल्य व क्षमता समजणे म्हणजे व्यावसायिक जाणीव होय.

चलः प्रस्तुत संशोधनात खालील चलांचा वापर केला आहे.

आश्रयी चल (Dependent variable): व्यावसायिक जाणीव

स्वाश्रयी चल (Independent variable): शैक्षणिक वातावरण

प्रोफाइल चल (Profile variables):

I. शाखा: कला/वाणिज्य/विज्ञान
II. लिंग: पुरुष/स्त्री
III. शाळेचा प्रकार: अनुदानित/विनाअनुदानित
IV. कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत: व्यवसाय/नोकरी/शेती

**3.2 संशोधनाची उद्दिष्ट्ये:** प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

1. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी शोधणे.

2. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात काही सार्थ संबंध आहे की नाही याचा शोध घेणे.

3. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांतील प्रोफाइल चलांमध्ये काही सार्थ संबंध आहे की नाही याचा शोध घेणे.

4. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात खालील प्रोफाइल चलांवर आधारित काही सार्थ फरक आहे की नाही याचा शोध घेणे.

I. शाखा: कला/वाणिज्य/विज्ञान
II. लिंग: पुरुष/स्त्री
III. शाळेचा प्रकार: अनुदानित/विनाअनुदानित
IV. कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत: व्यवसाय/नोकरी/शेती

5. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा काही सार्थ प्रभाव आहे का नाही याचा शोध घेणे.

**3.3 संशोधन परिकल्पना:**

1. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी "मध्यम" स्वरूपाची असते.

2. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात सार्थ संबंध असतो.

3. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांतील प्रोफाइल चलांमध्ये सार्थ संबंध असतो.

4. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात खालील प्रोफाइल चलांवर आधारित सार्थ फरक आहे .

I. शाखा: कला/वाणिज्य/विज्ञान
II. लिंग: पुरुष/स्त्री
III. शाळेचा प्रकार: अनुदानित/विनाअनुदानित
IV. कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत: व्यवसाय/नोकरी/शेती

5. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा सार्थ प्रभाव असतो.

**3.4 शून्य परिकल्पना:** प्रस्तुत संशोधन अभ्यासाच्या शून्य परिकल्पना खालील प्रमाणे आहेत.

1. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवेबाबत शैक्षणिक वातावरणाची पातळी मध्यम स्वरूपाची नसते.

2. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात कोणताही सार्थ संबंध नसतो.

3. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांतील प्रोफाइल चलांमध्ये कोणताही सार्थ संबंध नसतो.

4. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात खालील प्रोफाइल चलांवर आधारित कोणताही सार्थ फरक नाही.

I. शाखा: कला/वाणिज्य/विज्ञान
II. लिंग: पुरुष/स्त्री
III. शाळेचा प्रकार: अनुदानित/विनाअनुदानित
IV. कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत: व्यवसाय/नोकरी/शेती

5. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा कोणताही सार्थ प्रभाव नसतो.

संशोधनाची व्याप्ती

1. सदर संशोधन नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळांशी संबंधित आहे
2. सदर संशोधन नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीवेशी संबंधित आहे
3. सदर संशोधन नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व शालेय वातावरणाचा व्यावसायिक जाणीवेवर होणा-या परिणामांशी संबंधित आहे
4. सदर संशोधन वर्ष हे २०२० ते २०२३ या वर्षाशी संबंधित आहे.

### 3.5 संशोधनाची मर्यादा.

1. सदर संशोधन नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.
2. सदर संशोधन नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीवेपुरतेच मर्यादित आहे.
3. सदर संशोधन नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक व शालेय वातावरणाचा व्यावसायिक जाणीवेवर होणा-या परिणामांपुरतेच मर्यादित आहे.
4. सदर संशोधन हे २०२० ते २०२३ या वर्षापुरतेच मर्यादित आहे

### 3.6 संशोधनाची परिमर्यादा:

1. सदर संशोधनात नाशिक जिल्हयातील शहरी भागातील उच्च माध्यमिक शाळांचा समावेश केलेला नाही.
2. सदर संशोधनात नाशिक जिल्हयातील ग्रामीण भागातील अनुदानित, विनाअनुदानित व आश्रमशाळांचाच विचार केला आहे.
3. सदर संशोधनात नाशिक जिल्हयातील मराठी माध्यमांच्या उच्च माध्यमिक शाळांचा समावेश केला आहे.

### 3.7 प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या:

नाशिक जिल्हयातील एकूण १५ तालुक्यातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शाळा आहे.

प्रस्तुत संशोधनातील नमुना निवड पध्दतः

प्रस्तुत संशोधनात संभाव्यतेवर आधारित सुगम याद्दच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे.

नमुन्याचे वितरणः नाशिक जिल्ह्यातील ग्रामिण उच्च माध्यमिक विद्यालयातील १२२० विद्यार्थ्यांच्या नमुन्याचे वितरण कोष्टक क्रमांक मध्ये दिले आहे.

| उपनमुना | | | नमुना आकार |
|---|---|---|---|
| कला | वाणिज्य | विज्ञान | |
| 440 | 320 | 460 | 1220 |

### 3.8 माहिती संकलनाची साधने:

नाशिक जिल्हयातील ग्रामीण उच्च माध्यमिक शालेय विदयार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांचा त्यांच्या शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने खालील मापिकांचा वापर केला आहे.

1. विदयार्थ्यांची व्यावसायिक जाणीव मापिका (संशोधकनिर्मित)
2. विदयार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शालेय वातावरण मापिका (संशोधकनिर्मित)

संख्याशास्त्रीय साधनेः

शेकडेवारी, मध्यमान, प्रमाण विचलन, टी-परीक्षिका, एकमार्गी प्रसरण विश्लेषण (ANOVA)-F Test या संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करण्यात आला.

**4. विश्लेषण व अर्थनिर्वचन** (ANALYSIS & INTERPRETATION):

शून्य परिकल्पना:1.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी ‘ मध्यम’ स्वरूपाची नसते.

कोष्टक 1. शैक्षणिक वातावरण मध्यमान व प्रमाण विचलन

| अ. न. | चल | उपनमुना | N | मध्यमान | प्रमाण विचलन |
|---|---|---|---|---|---|
| | नमुना | | 1220 | 69.07 | 12.36 |
| 1. | शाखा | कला | 440 | 69.28 | 11.59 |
| | | वाणिज्य | 320 | 71.45 | 11.78 |
| | | विज्ञान | 460 | 67.21 | 13.18 |
| 2. | लिंग | पुरुष | 570 | 67.15 | 12.81 |
| | | स्त्री | 650 | 70.75 | 11.71 |
| 3. | शाळेचा प्रकार | अनुदानित | 738 | 69.77 | 12.45 |
| | | विनाअनुदानित | 482 | 67.99 | 12.17 |
| 4. | कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत | व्यवसाय | 168 | 69.13 | 13.37 |
| | | नोकरी | 114 | 67.85 | 10.77 |
| | | शेती | 938 | 69.20 | 12.36 |

वरील कोष्टक क्रमांक 1 नुसार माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीव संदर्भात शैक्षणिक वातावरणाचे मध्यमान संपूर्ण नमुना आणि त्याच्या उप-नमुन्यांसाठी 67.15 ते 71.45 या दरम्यान आहेत. संपूर्ण नमुन्यासाठी उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणीव संदर्भात शैक्षणिक वातावरणासाठी मध्यमान आणि प्रमाण विचलन अनुक्रमे 69.07 आणि 12.36 आहे. प्रमाण विचलन 11.78 ते 12.81 पर्यंत आहे आणि मध्यांतर फार मोठे नाही, हे गट एकसंध आहे हे दर्शविते.

सामान्य वितरणानुसार, 81 पेक्षा जास्त गुण मिळवणारे प्रतिसादक "उच्च" स्तराचे असतात, 57 ते 81 गुण मिळवणारे प्रतिसादक "मध्यम" स्तराचे असतात आणि 57 पेक्षा कमी गुण मिळवणारे प्रतिसादक शैक्षणिक वातावरणाच्या "निम्न" स्तराचे असतात. या आधारावर, संपूर्ण नमुना आणि त्याचे उपनमुने तीन स्तरांमध्ये विभागले गेले आहेत आणि ते कोष्टक 2. मध्ये दिले आहेत.

कोष्टक 2.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवेबाबत

नमुना आणि उपनमुन्यासाठी शैक्षणिक वातावरणाची पातळी

| अ. न. | चल | उपनमुना | N | निम्न | मध्यम | उच्च |
|---|---|---|---|---|---|---|
| | नमुना | | 1220 | 157 | 898 | 165 |
| | | | | 12.87% | 73.60% | 13.52% |
| 1. | शाखा | कला | 440 | 56 | 326 | 58 |
| | | | | 12.73% | 74.09% | 13.18% |
| | | वाणिज्य | 320 | 28 | 235 | 57 |
| | | | | 8.75% | 73.44% | 17.81% |
| | | विज्ञान | 460 | 73 | 337 | 50 |
| | | | | 15.87% | 73.26% | 10.87% |
| 2. | लिंग | पुरुष | 570 | 95 | 416 | 59 |
| | | | | 16.67% | 72.98% | 10.35% |
| | | स्त्री | 650 | 62 | 482 | 106 |
| | | | | 9.54% | 74.15% | 16.31% |
| | | | | 86 | 535 | 117 |

ISSN: 2581-6241
Impact Factor: 5.146
Publication Date: 31/10/2022


| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3. | शाळेचा प्रकार | अनुदानित | 738 | 11.65% | 72.49% | 15.85% |
| | | विनाअनुदानित | 482 | 71 | 363 | 48 |
| | | | | 14.73% | 75.31% | 9.96% |
| 4. | कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत | व्यवसाय | 168 | 25 | 115 | 28 |
| | | | | 14.88% | 68.45% | 16.67% |
| | | **नोकरी** | 114 | 15 | 89 | 10 |
| | | | | 13.16% | 78.07% | 8.77% |
| | | **शेती** | 938 | 119 | 692 | 127 |
| | | | | 12.69% | 73.77% | 13.54% |

वरील कोष्टक क्रमांक 2 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या संपूर्ण नमुन्यापैकी 73.60% शैक्षणिक पर्यावरणाची पातळी मध्यम, 12.87% निम्न आणि 13.52% उच्च पातळी आहे. उप-नमुन्यांबाबतही असाच कल दिसून येतो. यावरून असे दिसून येते कि, उच्चं माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक पर्यावरणाची पातळी ही 'मध्यम' स्वरूपाची आहे. यावरून शून्य परिकल्पनेचा त्याग करण्यात येत असून असा निष्कर्ष काढला जातो की, उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी "मध्यम" स्वरूपाची असते.

आकृती: 1

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची नमुना आणि

उपनमुन्यासाठी शैक्षणिक वातावरणाची पातळी




शून्य परिकल्पना 2.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात कोणताही सार्थ संबंध नसतो.

कोष्टक 3.

व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यातील संबंध

| चल | N | r-मूल्य | r-क्रिटिकल | सार्थकता स्तर | सार्थक/सार्थक नाही |
|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण | 1220 | 0.42 | 0.081 | 0.01 | S |

S: सार्थक (Significant)

NS: सार्थक नाही (Not Significant)

वरील कोष्टक क्रमांक 3 नुसार प्राप्त r- मूल्य 0.42 हे r- क्रिटिकल मूल्य 0.081 पेक्षा अधिक आहे आणि 0.01 स्तरावर सार्थक आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. यावरून उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात सार्थ संबंध असतो.

शून्य परिकल्पना 3.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांतील प्रोफाइल चलांमध्ये कोणताही सार्थ संबंध नसतो.

कोष्टक 4.

व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण

यांतील प्रोफाइल चलांमधील संबंध

| अ. न. | चल | उपनमुना | N | r- मूल्य | r-क्रिटिकल | सार्थकता स्तर | सार्थक/ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | शाखा | कला | 440 | 0.35 | 0.12 | 0.01 | S |
| | | वाणिज्य | 320 | 0.51 | 0.15 | 0.01 | S |
| | | विज्ञान | 460 | 0.40 | 0.12 | 0.01 | S |
| 2. | लिंग | पुरुष | 570 | 0.49 | 0.10 | 0.01 | S |
| | | स्त्री | 650 | 0.39 | 0.11 | 0.01 | S |
| 4. | शाळेचा प्रकार | अनुदानित | 738 | 0.46 | 0.08 | 0.01 | S |
| | | विनाअनुदानित | 482 | 0.33 | 0.11 | 0.01 | S |
| 4. | कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत | व्यवसाय | 168 | 0.41 | 0.19 | 0.01 | S |
| | | नोकरी | 114 | 0.17 | 0.23 | 0.01 | NS |
| | | **शेती** | 938 | 0.16 | 0.09 | 0.01 | S |

S: सार्थक (Significant)

NS: सार्थक नाही (Not Significant)

कोष्टक 4 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्या शाखा, लिंग, शाळेचा प्रकार, कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत यातील व्यवसाय व शेती प्रोफाइल चलांमध्ये 0.01 स्तरावर सार्थ संबंध असतो.

शून्य परिकल्पना 4.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात प्रोफाइल चलांवर आधारित कोणताही सार्थ फरक नाही.

4.1 उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात शाखांनुसार कोणताही सार्थ फरक नाही.

कोष्टक 5. अ

| उपनमुना | N | मध्यमान | प्रमान विचलन | F-मूल्य | F-क्रिटिकल | सार्थकता स्तर | सार्थक/ सार्थक नाही | शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | 440 | 69.28 | 11.59 | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाणिज्य | 320 | 71.45 | 11.78 | 11.39 | 3.0 | 0.05 | S | त्याग |
| विज्ञान | 460 | 67.21 | 13.18 | | | | | |

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात शाखांनुसार फरक

S: सार्थक (Significant)

NS: सार्थक नाही (Not Significant)

The multiple comparisons of Educational Environment scores among Higher Secondary School Students with respect to their branches of learning are made by using Bonferroni Post Hoc Test.

कोष्ट्क 5. ब

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची

शाखांनुसार तुलना(Bonferroni Pairwise Comparison)

| उपनमुना शाखा | N | मध्यमान | प्रमान विचलन | t- मूल्य | सार्थकता स्तर (α=0.05 ) | P- मूल्य | सार्थक/ सार्थक नाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | 440 | 69.28 | 11.59 | -2.52 | 0.017 | 0.006 | सार्थक |
| वाणिज्य | 320 | 71.45 | 11.78 | | | | |
| वाणिज्य | 320 | 71.45 | 11.78 | 4.71 | 0.017 | 1.5E-06 | सार्थक |
| विज्ञान | 460 | 67.21 | 13.18 | | | | |
| विज्ञान | 460 | 67.21 | 13.18 | 2.51 | 0.017 | 0.006 | सार्थक |
| कला | 440 | 69.28 | 11.59 | | | | |

वरील कोष्टक क्रमांक 5 अ नुसार प्राप्त F- मूल्य 11.39 हे F- क्रिटिकल मूल्य 3 पेक्षा जास्त आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. यावरून उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात शाखांनुसार सार्थ फरक असतो.

तसेच कोष्टक क्र. ५ ब नुसार शाखा-शाखांमध्येही शैक्षणिक वातावरणात सार्थ फरक असतो. तसेच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाच्या प्राप्तांकाचे मध्यमान मूल्य (71.45) हे कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकांचे मध्यमान मूल्य (69.28) व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या प्राप्तांकांचे मध्यमान मूल्य (67.21) पेक्षा अधिक आहे. यावरून वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वातावरण कला व विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणापेक्षा अधिक चांगले आहे.

4.2 उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात लिंग आधारित कोणताही सार्थ फरक नाही.

कोष्ट्क 6.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

वातावरणात लिंग आधारित फरक

| उपनमुना | N | मध्यमान | प्रमान विचलन | t-मूल्य | t-क्रिटिकल | सार्थकता स्तर | सार्थक/ सार्थक नाही | शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | 570 | 67.15 | 12.81 | -5.10 | 1.65 | 0.5 | N | स्वीकार |
| स्त्री | 650 | 70.75 | 11.71 | | | | | |

S: सार्थक (Significant)

NS: सार्थक नाही (Not Significant)

वरील कोष्टक क्रमांक 6 नुसार 0.05 सार्थकता स्तरावर प्राप्त t- मूल्य (-5.10) हे t - क्रिटिकल मूल्य(1.65) पेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला आहे व संशोधन परिकल्पनेचा त्याग केला आहे. यावरून उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात लिंगानुसार सार्थ फरक नसतो.

4.3 उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात शाळेचा प्रकार आधारित कोणताही सार्थ फरक नाही.

कोष्टक 7.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक

वातावरणात शाळेच्या प्रकारानुसार फरक

| उपनमुना | N | मध्यमान | प्रमान विचलन | t-मूल्य | t-क्रिटिकल | सार्थकता स्तर | सार्थक/ सार्थक नाही | शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुदानित | 738 | 69.77 | 12.45 | 2.47 | 1.65 | 0.05 | S | त्याग |
| विनाअनुदानित | 482 | 67.99 | 12.17 | | | | | |

S: सार्थक (Significant)

NS: सार्थक नाही (Not Significant)

वरील कोष्टक क्रमांक 7 नुसार 0.05 सार्थकता स्तरावर प्राप्त t- मूल्य (2.47) हे t - क्रिटिकल मूल्य(1.65) पेक्षा जास्त आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. यावरून उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात शाळेचा प्रकारावर आधारित सार्थ फरक असतो.

4.4 उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार कोणताही सार्थ फरक नाही.

कोष्टक 8.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार फरक

S: सार्थक (Significant)


| उपनमुना | N | मध्यमान | प्रमान विचलन | F-मूल्य | F-क्रिटिकल | सार्थकता स्तर | सार्थक/ सार्थक नाही | शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्यवसाय | 168 | 69.13 | 13.37 | 0.61 | 3.00 | 0.05 | NS | स्वीकार |
| नोकरी | 114 | 67.85 | 10.77 | | | | | |
| शेती | 938 | 69.250 | 12.36 | | | | | |

NS: सार्थक नाही (Not Significant)

वरील कोष्टक क्रमांक 8 नुसार 0.05 सार्थकता स्तरावर प्राप्त F- मूल्य (0.61) हे F- क्रिटिकल मूल्य(3) पेक्षा कमी आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा स्वीकार केला आहे व संशोधन परिकल्पनेचा त्याग केला आहे. यावरून उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार कोणताही सार्थ फरक नसतो.

5. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा कोणताही सार्थ प्रभाव नसतो.

आकृती: 2 उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा प्रभाव




कोष्टक 9.

व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा प्रभाव

| चल (Variable) | प्रतिगमन गुणांक (Regression Coefficient) | प्रमाणत्रुटी (Standard Error) | t- मूल्य (t-Value) | P- मूल्य (P-Value) | सार्थकता स्तर (Significa-nce Level) | शून्य परिकल्पना स्वीकार/त्याग |
|---|---|---|---|---|---|---|
| शैक्षणिक वातावरण | 0.319 | 0.020 | 16.09 | 5.5E-53 | 0.01 | त्याग |

वरील कोष्टक क्रमांक 7 नुसार प्राप्त P-मूल्य 5.5E-53 हे सार्थकता स्तर 0.01 पेक्षा कमी आहे म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे व संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला आहे. यावरून उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा सार्थ प्रभाव असतो.

**5. चर्चा (DISCUSSION):**

प्रस्तुत संशोधन अभ्यास नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांच्या त्यांच्या शैक्षणिक वातावरणाशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करण्यासाठी हाती घेतला आहे. या संशोधन अभ्यासाची उद्दिष्टे शैक्षणिक वातावरणाची पातळी शोधणे. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात त्यांच्या शाखा, लिंग, शाळेचा प्रकार आणि कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत यानुसार फरक आहे की नाही याचा शोध घेणे. तसेच उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यवसायिक जाणीव व शैक्षणिक वातावरण यांच्यातील संबंधाचे स्वरूप व प्रमाण शोधणे.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यवसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्या शाखा, लिंग, शाळेचा प्रकार व कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत या चलांमधे काही सार्थ संबंध आहे का याचा शोध घेणे तसेच उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवेवर वातावरणाचा काही प्रभाव आहे की नाही याचा शोध घेणे ही आहेत.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्षांना पूर्वीच्या संशोधनाचे काही निष्कर्ष समर्थन करतात व काही विरोध दर्शवितात. प्रस्तुत संशोधनातून असे दिसून आले की उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी मध्यम स्वरूपाची आहे. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात सार्थ संबंध आहे या निष्कर्षाचे समर्थन संगमा, नॅन्सी एम. (२०१३); ओमेन, अण्णा मारिया फ्रान्सिस्का एड्रियाना(२०१८); सॅम्युएल , ओ सॅलमी (२०१३); यांच्या निष्कर्षा द्वारे होते.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत व्यवसाय, नोकरी व शेती यावर आधारित कोणताही सार्थ फरक नाही. या निष्कर्षाला विरोध दाखविणारे निष्कर्ष मेहरा(१९८०) यांच्या संशोधनाचे आहेत. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा सार्थ प्रभाव आहे. या निष्कर्षास समर्थन करणारे निष्कर्ष कुमार, संजीव (२०१४); पवनकुमार (२०१८) यांच्या संशोधनाचे आहेत. ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवेबाबत शैक्षणिक वातावरणाची पातळी ही 'मध्यम' स्वरूपाची आहे. तसेच ग्रामीण भागातील उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात शाळेच्या प्रकारावर आधारित सार्थ फरक आहे. यावर फारसे संशोधन आढळून आले नाही. तसेच नाशिक जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर सामाजिक वातावरणाचा व शैक्षणिक वातावरणाचा सार्थ प्रभाव आहे. यावर अधिक संशोधन झालेले आढळून आले नाही. एकूणच प्रस्तुत संशोधाच्या निष्कर्षास समर्थन करणारे व विरोध दाखविणारे निष्कर्ष हे वेगवेगळ्या भागातील, कालावधीतील, परिस्थितील तसेच काही **प**रदेशातील संशोधनाचे निष्कर्ष आहेत.

## 5. निष्कर्ष (FINDINGS/ RESULT):

1. कोष्टक क्रमांक 1 व 2 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी "मध्यम(Moderate)" स्वरूपाची असते.
2. कोष्टक क्रमांक 3 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्यात( r = 0.42) भरपूर प्रमाणात (Substantial or Marked relationship)) स्वरूपाचा संबंध असतो.
3. कोष्टक 4 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव आणि शैक्षणिक वातावरण यांच्या शाखा, लिंग, शाळेचा प्रकार, कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाचा स्रोत यातील व्यवसाय व शेती प्रोफाइल चलांमध्ये संबंध असतो.
4. कोष्टक क्रमांक 5. अ नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखां मध्ये फरक असतो. तसेच कोष्टक क्र. ५ ब नुसार शाखा-शाखांमध्येही शैक्षणिक वातावरणात फरक असतो. तसेच कोष्टक क्रं. ५ ब वरून असा निष्कर्ष निघतो कि, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे पाठ्यपुस्तकाद्वारे जे अध्यापन केले जाते. त्यातील आशयामधून व्यावसायिक जाणिवेसंदर्भात अधिक माहिती मिळण्यास मदत होते. त्यामुळे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवेसंदर्भात शैक्षणिक वातावरण अधिक चांगले आहे.
5. कोष्टक क्रमांक 6 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात मुली आणि मुले यानुसार फरक नसतो.
6. कोष्टक क्रमांक 7 नुसार अनुदानित व विना-अनुदानित उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात फरक असतो.
7. कोष्टक क्रमांक 8 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणात व्यवसाय, नोकरी, शेती या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार कोणताही फरक नसतो.
8. कोष्टक क्रमांक 9 नुसार उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा प्रभाव असतो. व्यावसायिक जाणिवेस अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण केल्यास व्यावसायिक जाणिवेत वाढ होऊ शकते.

## 6. शिफारशी (RECOMMENDATIONS):

1. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाची पातळी "मध्यम(Moderate)" स्वरूपाची आहे ती अधिक वाढविण्याची आवश्यकता आहे.
2. उच्च माध्यमिक शाळांनी व्यावसायिक जाणीव निर्माण होण्यासाठी अनुकूल वर्ग वातावरण निर्माण केले पाहिजे.
3. कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांनुसार विद्यार्थ्यांना त्यांना अध्यापन केल्या जाणाऱ्या विषय ज्ञानावर आधारित व्यावसायिक जाणीव करून देण्याची आवश्यकता आहे.
4. कला व विज्ञान शाखेतील अध्यापन करणाऱ्या शिक्षकांनी त्यांच्या विषयाचे अध्यापन करताना जाणिवपूर्वक पूर्वनियोजितपणे व्यावसायिक शिक्षण, व्यावसायिक जाणीव, व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन इ. शी समवाय साधून व्यावसायिक जाणीव वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच मुख्याध्यापकांनी या शाखेतील विद्यार्थ्यांची व्यावसायिक जाणीव वाढविण्यासाठी विविध उपक्रमांची अंमलबजावणी करून घ्यावी.
5. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायाची जाणीव निर्माण करतांना मुले आणि मुली असा भेदभाव करू नये.
6. अनुदानित उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांचे उच्चं शैक्षणिक पातळीचे प्रमाण विनाअनुदानित पेक्षा अधिक आहे व निम्न आणि माध्यम पातळीचे प्रमाण कमीआहे म्हणून विना-अनुदानित शाळेतील शिक्षकांनी तसेच शाळा व शाळा चालकांनी व्यावसायिक जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. .
7. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्यामध्ये व्यवसाय, नोकरी, शेती या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार व्यवसाय निवडण्यासाठी मार्गदर्शन करताना भेदभाव करू नये.
8. उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक यांनी व्यावसायिक जाणिवेस अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करावे.

## 7. उपाययोजना (REMEDIES)

1. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवेत वाढ होण्यासाठी शाळेत विविध यशस्वी उद्योजकांची व्याख्याने आयोजित करावीत. व्यवसाय विषयक प्रदर्शनाचे आयोजन करावे. शासनाच्या विविध योजनांची माहिती द्यावी. शाळेत स्वतंत्र व्यवसाय विषयक मार्दर्शन व समुपदेशन कक्ष असावा. तेथे पूर्णवेळ या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची नेमणूक करावी .
2. उच्चं माध्यमिक शाळेतील विद्यार्थी त्यांच्या शिक्षक आणि मित्रांशी मुक्तपणे संवाद साधू शकतील आणि चर्चा करू शकतील आणि त्यांच्या व्यावसायिक जाणिवेत सुधारणा करू शकतील असे वातावरण शाळांनी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे. यासाठी स्वतंत्र तासिका शाळेत आठवड्यातून किमान ऐक दिवस ठेवावी. त्यांच्या व्यवसाय निवडीसाठ प्रोत्साहित केले पाहिजे.

3. कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांनुसार विद्यार्थ्यांना अनुकूल अश्या वेगवेगळ्या व्यवसाय मार्गदर्शन शिबिरांचे अथवा कार्यशाळांचे अथवा उद्योजकांच्या व्याख्यानांचे आयोजन करावे.
4. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायाची जाणीव निर्माण करताना मुले आणि मुली याना एकत्रितपणे मार्गदर्शन करावे. विविध व्यवसाय विषयक उपक्रम, कार्यशाळा, व्याख्याने यांचे आयोजन करताना मुले-मुली असा भेदभाव करू नये.
5. विना-अनुदानित उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाच्या पातळीत वाढ होण्यासाठी शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच शाळेमध्ये व्यावसायिक जाणीव निर्माण होण्यासाठी शाळेने विविध उद्योजकांची व्यवसाय मार्गदशन प व्याख्याने, प्रदर्शने, उपक्रम यांचे आयोजन करावे.
6. उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक जाणीव निर्माण होण्यासाठी शाळेत आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये व्यवसाय, नोकरी, शेती इत्यादी करणाऱ्या कुटुंबातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे.
7. शिक्षक, मुख्याध्यापक, संस्था चालक यांनी व्यावसायिक जाणिवेस पोषक असे वातावरण शाळेत निर्माण करावे. शिक्षकांनी आपल्या विषयाच्या अध्यापनातून विविध विविध व्यवसायांची जाणीव निर्माण होण्यासाठी विविध व्यवसायांशी समवाय साधावा. मुख्याध्यापकांनी शिक्षक व विद्यार्थ्यांना व्यावसायिक जाणीव निर्माण होण्यासाठी प्रेरणा द्यावी. संस्था चालकांनी ही लक्ष द्यावे. विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक जाणीव वाढेल असे अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करावे. व्यावसायिक जाणीव वाढविण्यासाठी आठवड्यातून किमान 1 दिवस प्रार्थनेच्या वेळी एखाद्या व्यवसायाची माहिती अथवा यशस्वी उद्योजकाची गोष्ट सांगण्याचा उपक्रम सुरु करावा. विद्यार्थ्यांचा व्यवसायांविषयीची माहिती देणारा व्हाट्सअँप गट तयार करावा. व्यवसायासंबंधीचे तक्ते तयार करून लावावेत. उद्योजगता यावर निबंध लेखनाच्या स्पर्धा घ्याव्यात.

**8. समारोप (CONCLUSION / SUMMARY):**

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणाच्या पातळीत वाढ करावी. व्यावसायिक जाणीव निर्माण करण्यासाठी अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण करावे. शाखांवर त्यांच्या विषयातील आशयावर आधारित व्यवसाय मार्गदर्शन देण्यासाठी प्राधान्य द्यावे. व्यावसायिक जाणीव निर्माण करताना मुले व मुली असा भेदभाव करू नये. विना-अनुदानित शाळेतील उच्च शैक्षणिक वातावरण्याची पातळी असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी असते म्हणून या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच व्यवसाय, नोकरी, शेती या कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नाच्या स्रोतांनुसार शैक्षणिक वातावरणात कोणताही फरक नसतो त्यामुळे सर्वाना सामान स्वरूपाची व्यावसायिक जाणीव निर्माण करण्यासाठी प्रयत्न व्हावे. या विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक जाणिवांवर शैक्षणिक वातावरणाचा प्रभाव असतो त्यामुळे व्यावसायिक जाणिवेस अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्माण केल्यास व्यावसायिक जाणिवेत वाढ होऊ शकते.

**संदर्भ (REFERENCES):**

1. भिंताडे, वि.रा. (२००६). *शैक्षणिक संशोधन पध्दती,* पुणे: नित्यनुतन प्रकाशन.
2. दुनाखे, अरविंद (२००६). *शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन.* नित्यनुतन प्रकाशन: पुणे.
3. घोरमोडे, के. यु. (२००८). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे.* विदया प्रकाशन: नागपूर.
4. Best, John & Kahn, James (2009). *Research in Education*, New Delhi: PHI Learning Private Limited.
5. Buch, M. B. (Ed.) (1991). *Fourth Survey of Research in Education*, Vol. 1 & Volume 2, New Delhi: NCERT.
6. Buch, M. B. (Ed.) (1998). *Fifth Survey of Research in Education*, Volume I & Volume 2, New Delhi: NCERT.

वर्तमानपत्रे:

1. कंठे, तनुजा (१९ ऑगस्ट २०२०) , नव्या शैक्षणकि धोरणात व्यावसायिक शक्षिण. दैनकि सामना, पान क्र. ७.
2. वार्ताहर (१९ मार्च २०२१), शाळा काॅलेजात व्यावसायिक शिक्षण अभयासासाठी समिती. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, पान क्रमांक ५.

मासिके:

1. नलावडे, प्रमोद (जून २०१३) दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण। लोकराज्य, पान क्र. ५.
2. पोतदार, योगिनी (मे-जून २०१९) कौशल्याचा विकास साधणारे शिक्षण. शिक्षण संक्रमण, पान क्र. १८-२०.

पीएच. डी. स्तरावरील संशोधने

1. गुप्त, विश्वनाथ (२००६), *केंद्राच्या व्यावसायिक शिक्षणाच्या योजनांची अभिवृत्ती आणि प्रभाव एक अभ्यास.* (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध), डॉ. राममनोहर लोहिया अवध विदयापीठ, फैजाबाद. Retrieved from Shodhganga- Areservoir of India thesis (http://hdl.handle.net/10603/230382)
2. भटनागर, एच. (१९८३), *'किशोरावस्थेतील विदयार्थ्यांची व्यावसायिक निवड आणि त्यांच्या अभिरूचीला प्रभावित करणा-या घटकांचा अभ्यास.'* (अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध), हिमाचल विदयापीठ, हिमाचल.
3. मोहन्ती, जी. (१९८६), '*स्वातंत्र्यानंतर ओरिसा राज्यातील व्यावसायिक शिक्षण एक सर्वेक्षण.'* Survey of Education, Volume 2, N.C.E.R.T. : New Delhi, Page. No. 1312.